(राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का.७ दि.०१/१०/२०२५ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट - ९ (ब)

## वाडा पंचायत समिती प्रारुप आरक्षणाबाबतची अधिसूचना

क्रमांक सामान्य प्रशासन/वाडा पंचायत समिती निर्वा.गण प्रारुप आरक्षण/कावि-१०/२०२५, दिनांक १४/१०/२०२५;

ज्याअर्थी, राज्य शासनाकडील आदेश क्र. जिपनि-२०२५/प्र.क्र.३६/पं.रा.-२, दिनांक १२ जून, २०२५ व क्र.जिपनि-२०२५/प्र.क्र.३६/पं.रा.-२, दिनांक १२ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार पालघर जिल्हा परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीकरिता ५७ निवडणूक विभागांच्या भौगोलिक सिमा **क्रमांक/सामान्य प्रशासन/कक्ष-२२०/टे.१/पालघर जिल्हा परिषद निवडणूक/कावि-०८/२०२५, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५** च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदी अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाकडील **क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का-७, दिनांक ०१/१०/२०२५** च्या आदेशान्वये पंचायत समितीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व स्त्रियांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाकडील **क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का-७, दिनांक ०१/१०/२०२५** च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची सोडतीद्वारे काढण्यात आलेल्या आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार वाडा पंचायत समितीमधील आरक्षित निर्वाचक गणांची जाहीर सोडत **दिनांक १३/१०/२०२५** रोजी काढण्यात आली. सदर सोडतीनंतर निश्चित झालेले निर्वाचक गणनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसूचना याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे;

आणि त्याअर्थी, सदर प्रारुप आरक्षणाची अधिसूचना जिल्हा परिषद क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असून सूचना देण्यात येत आहेत की, सदर प्रारुप आरक्षण अधिसूचनेस, ज्या लोकांच्या काही हरकती असतील, त्यांनी त्या जिल्हाधिकारी पालघर/ सबंधित तालुक्याचे तहसीलदार यांच्याकडे **दिनांक १७/१०/२०२५** पर्यंत सादर कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या हरकती विचारात घेण्यात येणार नाही.

### वाडा पंचायत समितीमधील एकूण जागांचा तपशील

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ०० | ०० |
| २ | अनुसूचित जमाती | ०७ | ०४ |
| ३ | नागरिकांचा मागास प्रवर्ग | ०१ | ०० |
| ४ | सर्वसाधारण | ०४ | ०२ |
| | एकूण | १२ | ०६ |

**वाडा पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षण**

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभाग क्रमांक व नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | वाडा | ३१ वरसाळे | ६१ वरसाळे | अनुसूचित जमाती |
| | | | ६२ डाहे | अनुसूचित जमाती (स्त्री) |
| २ | वाडा | ३२ गांधरे | ६३ कोने | अनुसूचित जमाती (स्त्री) |
| | | | ६४ गांधरे | अनुसूचित जमाती |
| ३ | वाडा | ३३ गालतरे | ६५ गालतरे | अनुसूचित जमाती |
| | | | ६६ गोऱ्हे | सर्वसाधारण |
| ४ | वाडा | ३४ खानिवली | ६७ खानिवली | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| | | | ६८ बिलोशी | अनुसूचित जमाती (स्त्री) |
| ५ | वाडा | ३५ खुपरी | ६९ खुपरी | सर्वसाधारण (स्त्री) |
| | | | ७० आबिटघर | अनुसूचित जमाती (स्त्री) |
| ६ | वाडा | ३६ कुडूस | ७१ कुडुस | सर्वसाधारण (स्त्री) |
| | | | ७२ चिंचघर | सर्वसाधारण |

जिल्हा : पालघर
दिनांक : १४/१०/२०२५

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर
सत्यमेव जयते

(डॉ. इंदु राणी जाखड़)
जिल्हाधिकारी पालघर